॥ श्रीगुरुः शरणम् ॥



प. पू. योगीराज सद्गुरू

# श्रीसिद्धयोगेश्वर महाराज

## दर्शन

प्रकाशन स्थळ : मुंबई ★ दिनांक : १२।१०।७८

लेखक

श्री. प्रल्हाद पुंडलीकराव गोडगे, पंढरपूर

मूल्य : अनमोल

शक्तिपात दिक्षेद्वारा हंजारो साधकांना
आत्मोद्धाराचा मार्ग दाखवून कृतार्थ करणाऱ्या
प. पू. श्री सिद्धयोगेश्वर महाराज तथा बाबा
यांचे चरणी प्रेमपूर्वक समर्पण

--- **प्रल्हाद**

# प. पू. सद्गुरु श्रीसिद्धयोगेश्वर महाराज



लेकुराचे हित । जाणे माउलीचे चित्त ।
ऐसी कळवळयाची जाती । करी लाभाविण प्रीती ।
पोटी भार वाहे । त्याचे सर्वस्वहीं साहे ।
तुका ह्मणे माझे । तुम्हां संतावरी ओझे ।।

--- श्रीसन्त तुकाराम महाराज

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

भारताचे आगळेपण येथील सिद्धपुरुषांच्या दिव्य नि अलौकिक जीवन गाथेत आहे. सिद्ध पुरुषाचे जीवन म्हणजे आचार व विचार यांच्या एकरूपतेचें प्रतीकच. प्रसिद्ध पुरुष बरेच असू शकतील पण सिद्ध क्वचितच असतात. व असा एखादा सिद्ध पुरुष ज्या देशात जन्माला येतो तो देश धन्य होय, ज्या आईवडिलांचे पोटी जन्मास येतात ते आईवडिल धन्य होत व ते कुलही धन्य होय.

कृतार्थौ पितरो तेन धन्यो देशः कुलं चतत ।
जायते योगवान यत्र दत्त मक्षयतां व्रजते ॥

प. पू. सिद्ध योगेश्वर महाराज मुंबई येथे असतात खरोखरीच ते ज्या मात्या पित्या पोटी आले ते माता पिता धन्य होत. परतू हा ही एक विचार येवून जातो कि ज्यांचे पोटी असे सिद्ध पूरुष जन्मास येतात त्यांचाही तेवढा अधिकार असला पाहिजे त्याविना हे शक्य नाही.

प. पू. सिद्ध योगेश्वर महाराजांचे आई वडील मूळ राहणार चिपळून तालुक्यातील दहिवलीचे वडिलांचे नांव बाळाजीराव व आईचे जयवंती. हे उभयतां उच्चकोटीतील दत्त भक्त सद्गुरु अक्कलकोट स्वामीच्या परंपरेतील हे घराणे घरची परिस्थिती ही उत्तम शेतीवाडीही बरीच एवढे असूनही ते नोकरी करीत. मिल्ट्रीमध्ये ते एक ऑफिसर होते. तरीही व्यवसायास भक्तीमार्गांत आड येवू दिले नाही.

घरी औदुंबराचे दोन वृक्ष. दोन्हीच्या मध्यभागी श्री दत्त पादुका. आई जयवंती याना दत्त सेवेविना कसे करमेल. त्याही अशा

मंगल ठिकाणी दत्त सेवेत मग्न असत. व दत्त प्रभूंची सेवा म्हणून लक्ष लक्ष प्रदक्षणा करत. अशा रितीने कालक्रमणा होत असतां त्याना एक मुलगा व एक मुलगी झाली. सद्गुरुसेवा चालूच होती. जणू देश व कुळाचा उद्धार करणाऱ्या सिद्ध पुरुषानें आपल्या कुशीत जन्मघ्यावा म्हणूनच प्रभकृपेनें तो सुदीन उगवला व १५-१२-१९२७ या शुभ दिवशी या सिद्ध पुरुष ने या भक्त परायण मात्या पित्या पोटी जन्म घेवून त्यांया धन्य केले. आई वडिलानी या बालकाचे नांव वसत ठेवले. कारण त्यामुळे त्यांचे जीवनातील वसंन्त फुलला होता व अनेकांचे जीवनातील वसंत फुलविला जाणार होता.

जगरुतीप्रमाणें नित्याचें व्यवहार सुरु झाले. शाळा अभ्यास सुरु झाला. अभ्यासात चांगली प्रगती होती. वयाच्या दहाव्या वर्षापासूनच सूचक दृष्टांताना सुरुवात झाली. अभ्यासात मन रमत नव्हते. गणिती प्रमेय सोडून विश्वाच्या गूढतेचे प्रमेय काय व कसे सुटल यातच विचार मग्न असत. अशा स्थितित ते मुंबईस आलें.

मुंबईत त्यांची बहीण व मेहुणें आहेत. तेथेच त्यांचा मुक्काम होता मेव्हण्यास ते दाजी म्हणतात. सुस्वभावी दाजी व बहीण या उभयतांनी आई वडिला प्रमाणें त्याना प्रेम दिले कांही कमी पडू दिले नाही. तेथेच म्हणजे मुंबई येथ त्यांनी नोकरी पत्करली. परतू नोकरीतही मन रमेना मनाची स्थीती कांही औरच बनली होती. " न लग्न मुवती धन संपदा संत संग देई सदा ,, याच विचारात ते नेंहमी मग्न असत. नेहमी वृत्तीं उदास, सारखा ध्यास तो ईश्वराचा साहजीकच ससारीक सुखा पासून वृत्ती दुरावू लागली हा बाका प्रसंग पाहून यांचे आईनी यांचे लग्न करावयाचे ठरविले. मन तय्यार होत नव्हते व आईची आज्ञाही टाळता येत नव्हती व आईची आज्ञा शिरोधार्य मानून आईच्या इच्छेनुसार भाग्यवती, सुस्वभावी व प्रेमळ

गीताईचा अर्धांगी म्हणून स्वीकार केला. गिरगावातील १५ बाय १० च्या खोलीत संसार सुरु झाला. आफिसात ही मन उद्विग्न असायचे सारखी तळमळ काम सुचायचेंच नाही खाणे नाही कपडयाची शुद्ध नाही. पण आतां या बाबींची काळजी घेण्याची जबाबदारी सौं. गीताईवर पडली.

हा सर्व प्रकार चालू असताना महाराजांची स्थिती मात्र निराळीच झाली होती. मन्त्रजपाची अनुष्ठाने, हटयोगाचा अभ्यास यामुळे सिद्धि प्राप्त झाल्या सिद्धी प्राप्त होणे म्हणजे सर्वस्व प्राप्त झाले. असे नव्हे याचे लक्ष कांही वेगळेच होते. व त्या विचारात याचे मन नेंहमी गुंतलेले असायचे.

मुम्बई म्हणजे गजबजलेली नगरी अशा ठिकाणी शांत व निवांतपणा कोठला ? " या निशां सर्व भूतानां तस्या जागर्तीसंयमी" या उक्ती प्रमाणे हे योगी सर्व जग झोपले असताना हे एकटेच समुद्रकिनारी बसलेले असायचें मनात एकाच विचाराने काहूर माजलेलें. परमेश्वर प्राप्ती कशी होईल. लोकापासून दूर म्हणून एकटेंच जावून समुद्रकिनारी निवांतपणा म्हणून बसायचे. पण काहीं दिवसांनी त्यांचे पासून थोडया अन्तरावर तीन सन्यासी येवून बसू लागले. महाराजांचे मनांत विचार आला की मी ज्यास टाळू इच्छितो ते टळत नाही. आपल्यामुळे कोणास व्यत्यय नको म्हणून जागा बदलायचे ठरविले. नन्तर घरी येवून ध्यान्यास बसले. ध्यानामध्ये त्यातील एक सन्यासी प्रकट झाले. ज्याना त्यानी समुद्रकिनारी पाहिले होते. गहुवर्ण वयानें ३० च्या आसपास तेजस्वी नेंत्र जरा पिंगटशी दाढी असे तेजःपूंज़ स्वरुप त्यांनी विचारले मला ओळखलेस ? महाराज उत्तरले नाही. मग त्यानी स्मित हास्य करुन सांगितले मीच तो गोरक्षनाथ. व हे ऐकताच महाराजांच्या नेत्रातून अश्रूधारा वाहु

लागल्या ओळख पटल्यावर पुन्हा या रुपात दर्शन घडणार नाही. या बद्दल वाईट वाटून महाराज म्हणाले मला या स्वरुपांत पुन्हा दर्शन हवय यावर त्यांनी सांगितले उद्या सकाळी तुझे घरी यवून तुला व तुझ्या पत्नीस दर्शन देईन व अशा रीतीने प्रत्यक्ष गोरक्षनाथानी दर्शन देवून कृतार्थ केले.

शिर्डीचे साईबाबा म्हणजे ही दत्तावतारीच. त्यांचेहि मार्ग-दर्शन याना मिळायचे १५ । १६ तास साधना व्हायची. या काळात खरे कष्ट सोसावे लागले असतील तर त्या माऊलीस म्हणजे सौ. गीताईस परन्तु या माऊलींनी कधी ब्र उच्चारले नाही. जणू त्यांचीहीं हि साधनाच चालू होतीं. व अशा रितीने श्री शंकर पार्वती प्रमाणें यांचे जीवन चालू होते.

प पू सिद्धयोगेश्वर महाराजाना सर्वजण बाबा म्हणतात. आपणही बाबाच म्हणूया.

पु. बाबाना सिद्धी प्राप्त झाल्या होत्या पण सिद्धसद्गुरुचे दर्शन घडले नव्हते सुरवातीपासून एकच ठाम धारणा कि जे कुंडलिनी जागृत करु शकतील तेच सद्गुरु व अशा सद्गुरुच्या शोधात हे नेहमी असायचे. पण त्यासाठीही योग यावा लागतो परन्तू बेचैनी बसू देईना सद्गुरुप्राप्तीसाठी संसार सोडून जाण्याचें विचार प्रबळ होवू लागले. परन्तू यावेळी प्रत्यक्ष श्री दत्तप्रभूनीच दृष्टांत दिला व घर न सोडणेंची आज्ञा केली. व लवकरच सद्गुरु प्राप्ती होईल. असा आशिर्वाद दिला.

अशा रितीनें कालक्रमणा होत असताना १९६४ साल उजाडले हे वर्ष म्हणजे पू बाबांचे जीवनांतील सुवर्णाक्षरानी नोंदविलें जाणारे वर्ष कारण ज्यासाठी इतके दिवस धडपड चालू होती ते मिळणार होते. समर्थांनीही म्हटले आहे.

" जयासी मोक्ष व्हावा तेणें सद्‌गुरुची सेवावा ।
सद्‌गुरुविण मोक्ष पावावा हे कल्पांती न घडे ॥

सद्‌गुरु प्राप्ती –

तो भाग्यशाली दिवस उजाडला व त्या दिवशी सद्‌गुरुसानिध्य लाभले. हे सद्‌गुरु तर औरच दिसत होते.

मुंड मुंडाये तीन गुन छुटत नही खाज
लड्डुआ खानेंको मीले लोग कहे महाराज ॥

अशापैकी ते महाराज नव्हते. तर सिद्ध सद्‌गुरु होते.

साधी राहणी, धोतर, शर्ट, टोपी, हा पोशाख, पाहिल्यानन्तर वाटणारहो नाही की हे सद्‌गुरुंगदी विराजमान झाले असतील. पण बाह्य स्वरुपाशी करायचे काय ? एकन्दर सद्‌गुरुची चर्या, त्यांचे ते अर्धोन्मिलीत नेंत्र व चेहऱ्यावरील ते तेजच जणु सांगत होते की,

हम तो जोगी मन ही के तन के हैं तो और
मनका जोग लगावते ते दसाभई कुछ और ॥

व हे सद्‌गुरु म्हणजेच प. पू. योगीराज श्री. वामनरावजी गुळवणी महाराज

सद्‌गुरुच्या दर्शनानें पु. बाबांचे अष्टसात्विक भाव जागृत झाले. व जणू कांही न बोलताच दिक्षेची याचना केली जात होती. सद्‌गुरुनीही नुसत स्मित केले. व त्यांची दृष्टीच जणू सांगत होतीं.

माझे माझ्यात कांही नाही जे आहे तुझेच सारे
तुझे तुलाच देण्यात माझे काय जाते रे ॥

शिष्याची एकूण तयारी पाहून दिक्षेचा दिवस ठरला. व त्या प्रमाणें सद्गुरुनी सर्व सूचना दिल्या, आज जिवा शिवाची भट होणार होती. ज्यासाठी आज पर्यंत तळमळ होतो ते मिळणार होते. झाले सद्गुरुनी ठरलेंल्या शुभदिवशी शिष्यावर कृपा केली. सद्गुरुनी कृपा केली. म्हणजे काय केले. तर

सद्गुरुसाचा सुरमा नख शिख मारापूर
बाहर घाव न दिखई भितर चकनाचूर ।।

आणि मग शिष्याची अवस्था –

अहं निर्विकल्पो निराकार रुपी ।
विभुर्व्याप्य सर्वत्र सर्वेंद्रियाणी ।
सदा में समत्वं न मुक्तिर्न बंध ।
चिदानन्द रुपं शिवोहं शिवोहं ।।

जिवन कृतार्थ झाले. व योगेश्वराचे सिद्धयोगेश्वर झाले:

कुडलिनीं जागृत करण्याची दिक्षा फक्त सिद्धसद्गुरुच देवू शकतात स्पर्श भाषण दर्शन व संकल्प या चार प्रकारानी ही दिक्षा होते. योगवाशिष्ठात ही म्हटले आहे.

दर्शनात स्पर्शनात, शद्वात कृपया शिष्यदेहके
जनयेद्यः समावेशं शांभवंस हि देशिकः ।।

जे दर्शनाने, शद्व ने, स्पर्शानें व कृपा म्हणजे संकल्पानें शिष्याचें देहात ज्ञानाचा समावेश करतात ते साक्षात शिवस्वरुप असतात.

गुरुकृपेनें कुंडलिनी शक्ती जागृत होणे यासच शक्तिपात दिक्षा म्हणतात.

सद्गुरु हस्तस्पर्शाने मन्त्रोपदेशाने दृष्टीनें किंवा संकल्पाने श्रद्धाळू शिष्यात शक्तीचा संचार करीत असतात. यामध्यें संकल्प हा सर्वांमध्यें अनुस्यूत असल्याने तोच मुख्य आहे. स्पर्शादिक बाह्य साधन आहे. स्पर्शद्वारा होणारी दीक्षा स्थूलदीक्षा मन्त्रोपदेशद्वारा होणारी सूक्ष्म व दृष्टी द्वारा व संकल्पाने होणारी दीक्षा सूक्ष्मतम होय

पू. बाबांचा अधिकार जाणून सद्गुरुनी त्यांना दीक्षेचा अधिकार दिला. व दीक्षा देणेंस सुरवात करणेस सांगितले. सद्गुरूंची आज्ञा शिरोधार्य मानून पू. बाबांनी पहिली संकल्प दीक्षा मुंबईचे श्री.हेंमप्रकाश रावूत यांना दिली सद्गुरु सानिध्यात असे पर्यन्त यांनी जवळ जवळ ३० जणावर कृपा करून कृतार्थ केले. व आता पर्यन्त ७ । ८ शें लोकांना तरी दिली असेल हे कार्य चालूच असून मुंबई पुरतेच मर्यादित न राहता पुणें, नासिक, नागपूर, बार्शी, पंढरपूर असे सम्पूर्ण महाराष्ट्रात पसरत आहे.

एक चमत्कार : :

पू. बाबांच्या सान्निध्यात असणाऱ्याना व शिष्याना अनेक अनुभव येतात चमत्काराविषयी बाबांना कोणी कांहीं विचारले तर चमत्काराविषयी उदासीन दिसणारें बाबा म्हणजे हे एक महायोगी आहेत हेच दिसून येते.

डोंबवलीच्या गजानन वस्तू भांडारचे मालक श्री. तात्या जोशी हे पू. बाबांचे निस्सिम भक्त. दर सोमवारी ते दर्शनास येत पण ओळीने दोन सोमवार त्यांना दर्शनास येणे जमले नाहीं मग पु. बाबानी जवळचेच एक शिष्य श्री दादा कार्लेकर यांना फोनवरून त्यांची चौकशी करण्यास सांगितले परन्तु दादा फोन करणेंस विसरले. तिसरे दिवशी पुन्हां पू. बाबांनी दादास विचारले फोन केला

कां ? तेव्हां दादा म्हणाले आता फोन करून येतो. परन्तु पू. बाबा म्हणालें आता फोन करण्याची आवश्यकता नाहीं. ते संध्याकाळी येतील आणि तात्या पू बाबांच्या दर्शनासाठी आले दर्शन घेऊन झालेवर पू बाबांनी तत्यांना दादांची भेट घेण्यास सांगितले. त्या प्रमाणे तात्या दादांच्या भेटीस गेले. तात्याना पाहून दादाना एकदम आश्चर्य वाटले. दादानी सांगितले चला दर्शनास जावू या बाबाही तुमची आठवण करतात. तेव्हां तात्या म्हणाले, दर्शन घेऊनच पू. बाबांच्या निरोपाप्रमाणें आपणांस भेटावयास आलो. तेव्हां दादा म्हणाले गेल्या दोन तीन दिवसांत आपणांस बोलावण्यासाठीं बाबांनी मजकडे निरोप दिला होता. पण मला विसर पडला त्यावर तात्या म्हणाले मी दुपारी वामकुक्षीस ठी पडलो असतांना पू बाबांचे दर्शन घडले व बाबा म्हणाले मी तिकडे आपली वाट पाहत आहे व आपण इकडे स्वस्थ आहात मी कांहीं बोलण्याचे आतच बाबा अदृश्य झाले. उठून कपडे केले व तसाच दर्शनासाठी आलो दर्शन घेतले. व आपणाकडे आलो. हे एकत असताना दादांच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते.

अधुनिक वैज्ञानिक युगात साधनांची रेलचेल असताना त्याचा उपयोग न करता तात्याना दर्शनाद्वारे निरोपाने बोलावून घेवून पू बाबानी सर्वांना चकितच केलें.

सर्वांच्या आईसाहेब:-

खोताच्या वाडीतील चावेज कंपावूंड मधील ती छोटीशी खाली जागा अपूरीच पण माणसांची रेलचेल खूपच. बरीच मडळी परगावहूनही येतात त्यांची विचारपूस त्यांना चहापाणी हे सर्व काम पू बाबांच्या सहचारिणी व सर्वांच्या आईसाहेब याच करतात दिवसभर कामाचा बराच ताण पडतो पण चेहऱ्यावर कधी थकवा

नाही, राग नाहीं नेहमी प्रफुल्लित व हसत मुख. स्वत:ची ४ गोंडस मुले त्यांचेवर जेवढी त्यांची माया तद्वतच सर्वांबरही दिसून येते. व सर्वजण त्याना आईसाहेब म्हणतात ते सार्थ वाटते.

शिष्यावर कृपा :-

नानासाहेब म्हाप्रस करांच्या पोटावरील शस्त्रक्रिया, सावंताच्या डोक्यावर जबर मार बसून आलेले अंधत्व किंवा देसाईची विशिष्ठ अवस्था या बाबत पू बाबांच्या कृपेनेच सर्वांचें कल्याण झाले नानांच्या शस्त्रक्रियेच्याच बिषयी आलेले गंडांतर केवळ पू बाबा होते म्हणूनच दूर झाले तर सावंतास नित्य साधनेमुळे दिसू लागले देसाईच्या अवस्थेत ही बराच फरक पडला व नित्याचे व्यवहार ते स्वत: पाहू लागले. पण

२० जूलै १९७८ गुरुपोणिमेच्या दिवशीचा प्रसंग म्हणजे एक आगळाच ठरला.

दादा कार्लेकर यांची सद्गुरुवर एवढी अपार निष्ठा जेवढी कल्याणाची श्री समर्थावर ' दीक्षेपूर्वी दादा म्हणजे पंढरोचे वारकरी पण दीक्षेनंतर हे सर्व बदलून गेले. पढरीस पांडूरंगाच्या दर्शनास ते ज्या निष्ठेने जात असत तेवढीच निष्ठा आता सद्गुरुचरणी जडली. गुरुपोर्णिमेचा दिवस हाच आपला शेवटचा दिवस याची जाणिव ५-६ दिवस पूर्वीच त्यांना दृष्टांताने झाली होती पण कोणास न सांगता पत्नीस ५ दिवस नंदादिप ठव अशी सूचना केली गुरुपोर्णिमा उत्सवाची सर्व कामे ते इतरांना समजावून देवू लागले. व या पूढे तूम्हांस सांभाळावयाचे आहे असे सांगू लागले कोणास या गूढ बोलण्याचा अर्थ कळेना. दादाही उत्साहाने भाग घेत होते तरी त्यांचा मलूल पणा लपत नव्हता. सर्व कामे यंत्रवत चालली होती.

झाले. पु. सद्‌गुरुंची पूजा झाली. नंतर साधक पू. सद्‌गुरुंचे समोर साधनेस बसले पण दादा मात्र यात नाहीत ते दुसरी कडेच विमनस्क बसले होते. हे महाराजानी पाहीले व त्यांना तेथून उठविले. साधने नंतर बरोबर घेवून घरी आले. सर्व साधक दर्शन घेवन घरी गेले. पू. बाबाचे घरी बाकीचें कामे आटोपण्यास १५।२० साधक राहिले होते पू बाबांनी सर्वांस जेवायास बसविलें. जेवणानतर दादा दरवांजा शेजारीच स्टुलावर बसले होते. एकदम त्यांचा चेहरा ओढल्यासारखा झाला त्यांना जाणीव झाली त्यांनी. त्यांच. मुलगा ज्ञानेश्वर यास पाणी मागितले. ज्ञानेश्व ने घाईने पाणी आणून दिले दादानी पाण्याचा पेला ओठापर्यंत नेंण्याचा प्रयत्न केला पण ते नेवू शकले नाहीत ते स्टुलावरुन एकदम कोसळले. पाहणारे, शेंजारी बसणाऱ्यानी भयचित्कार काढले. तर कोसळताना त्यांना धरणेसाठी नानासाहेब म्हापूसकर, भाऊसाहेब पितांबरे, श्री. सावत हे धावून आले. पडता तडता ज्ञानेश्वरने पेला उचलन धरला तेथे असलेल्या १५।१६ माणसांची एकदम धावपळ उडाली नव्हे सर्वजण गर्भगळीत झाले आजच्या शुभ पर्वणीस हा अनुचित प्रकार घडून सर्वाबर पाणी पडणार ! सगळेच अगदी घाबरुन गेले पण. पण पू. बाबा मात्र शांत व धिरगंभीर दिसत होते. त्यांची मुद्रा नेहमी प्रमाणें तेजस्वी व धिरगभीर दिसत होते. तो वर सर्वानी मिळून दादाना कोचवर झोपविले. हेमप्रकाश रावूत व उमाकांत हे डॉक्टराना बोलावण्या साठी गेले. कांही जण दादाचे हातपाय चाचपून पाहू लागले. तर कानात मोठ्याने हाक मारु लागले. इकडे स्त्रियांची तर बोबडीच वळली. दादांची नाडी सुटू लागली. शेवटी तीही हातास लागेना व त्यानी डोळें फिरवले तेवढ्यात डॉक्टर आले त्यांनी दादांची नाडी छाती तपासली व म्हणाले त्याची तर नाडी लागेना काय झाले न कळे. पण आता

कठीण आहे. ज्ञानेश्वर दादा ऽऽ म्हणून किंचाळलाच. मग मात्र पू. बाबा उठून जवळ आले व म्हणाले कांही घाबरू नका सर्व ठीक होईल त्यांनी शांतपणें विभूती आणून दादांचे कपाळी लावली. व मुखात ही घातली. व सर्वांगावरुन हात फिरवीला नतर दादा दादा म्हणून दोन हाका मारल्या दादांचें शरीर किंचित चाळवले नंतर दोन तीन मिनीटांनी दादानी डोळे उघडले व बाबांकडे भरलेंल्या डोळ्यानी पाहिले. पहाणारेही सदगदीत होवून गेले. अशा रितीनें सद्‌गुरुकृपेने दादाना नवजिवन मिळाले. गुरुकृपा तसेच पू. बाबांची श्रेष्ठता शब्दात वर्णन करता येणार नाही.

वरील सर्व प्रकार म्हणजे जणू श्री गुरुचरित्र अध्याय ३२ ची पुनरावृत्तीच होय.

अशा रितीने सद्‌गुरु महिमान मोठें आहे. ईश्वर व सद्‌गुरू दोघेंही पुढें आले तर प्रथम वंदन कोणास करावे? असा कोणी प्रश्न केला तर महात्मा कबीर म्हणतात प्रथम वंदन सद्‌गुरुस व नंतर ईश्वरास. कारण ईश्वर प्रसन्न झाला तर जगातील सर्व वैभव मिळेल पण सद्‌गुरु कृपेने ईश्वराचा साक्षात्कार घडवतात व म्हणूनच कबीरही म्हणतात –

गुरु गोविंद दोऊ खडे कोके लागू पाय ।
बलिहारी गुरु अपनें जिन गोंविद दियो बनाय ।

व म्हणूनच

गुरुब्रंम्हा गुरुर्विष्णु । गुरुर्देवो महेश्वरः
गुरु साक्षात्परब्रम्ह । तस्मै श्री गुरवे नमः -

ॐ शांती शांती शांती ।

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

## – गणेश वन्दनम् –

वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटीसमप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥

## – आदिशक्ति –

सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।
शरण्ये त्र्यबके गौरि नारायणी नमो ऽस्तुते ॥

## – विष्णु ध्यान –

शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं ।
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभाङ्गम् ।
लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं ।
वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ।
वसुदेवं सूतं देवं कंस चाणूर मर्दनम् ।
देवकी परमानन्दम् कृष्णं वन्दे जगद्गुरुं ॥

## – गुरु वन्दनम् –

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नमः

श्रीमत् परब्रह्म गुरुः स्मरामि । श्रीमत् परब्रह्म गुरुः भजामि ।
श्रीमत् परब्रह्म गुरुः यजामि । श्रीमत् परब्रह्म गुरुः नमामि :।

ब्रह्मानन्दम परमसुखदम केवल ज्ञानमूर्तिम्
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ॥

एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरु तं नमामि ॥
नित्यशुद्ध निराभासं निराकारम् निरंजनम् ।
नित्यबोधं चिदानंदम सद्गुरु त्वम् नमामि ॥

## – दत्तात्रेय ध्यान –

दत्तात्रेय हरे कृष्ण उन्मत्तानन्ददायक ।
दिगम्बर मुनेबाल पिशाच ज्ञानसागर ॥
दत्तात्रेयं शिवं शान्तं इन्द्रनीलनिभं प्रभुम ।
आत्ममायारतं देवं अवधूत दिगम्बरम् ॥
ज्ञानयोगनिधि विश्वगुरुम् योगिजन प्रियम् ।
भक्तानुकम्पिनम् सर्वसाक्षिणं सिद्धसेवितम् ॥
दत्तात्रेयो महायोगी भगवान भूत भावनः ।
चर्तुर्भूजो महाविष्णु योगसाम्राज्यदीक्षितः ॥
जगदंकुरकन्दाय सच्चिदानन्द मूर्तये ।
दत्तात्रेयाय योगीन्द्रचन्द्राय परमात्मनें ॥
दिगम्बरम् भस्मविलेपितांगम् ।
बोधात्मकं मुक्तिकरं प्रसन्नम् ॥
निर्मानसं श्यामतनु भजे हं ।
दत्तात्रेयं ब्रह्मसमाधि युक्तम् ॥
अवधुत सदानन्द परब्रह्मस्वरुपिणें
विदेह देहरुपाय दत्तात्रेय नमोस्तुते ।
त्वमेवैकः परंब्रह्म सच्चिदानन्दमद्वयम् ।
अव्यक्तं व्यक्तिमापन्न दत्तात्रेयं जगद्गुरुम् ॥

## - श्री दत्तात्रेय स्तोत्रम् -

दयात्रेयं महात्मानं वरदं भक्तवत्सलं ।
प्रपन्नार्तिहरं वन्दे स्मर्तृगामी स मा ऽ वतु ॥ १ ॥

दीनबन्धु कृपासिंधुं सर्वकारण कारणं
सर्वंरक्षाकर वन्दे स्मर्तृगामी स मा ऽ वतु ॥ २ ॥

शरणागतदीनार्तं परित्राण परायणं ।
नारायण विभुं वन्दे स्मर्तृगामी स मा ऽ वतु ॥ ३ ॥

सर्वानर्थहरं वन्दे सर्व - मंगल मंगलम् ।
सर्वक्लेशहर वन्दे स्मर्तृगामी स माऽवतु ॥ ४ ॥

शोषणं पापमंकस्य दीपनं ज्ञानतेजसः ।
भक्ताभीष्टप्रदं वन्दे स्मर्तृगामी स मा ऽ वतु ॥ ५ ॥

सर्वरोगप्रशमनं सर्वपीडानिवारणम् ।
तापप्रशमन वन्दे स्मर्तृगामी स मा ऽ वतु ॥ ६ ॥

ब्रह्मण्य धर्मतत्वज्ञं भक्तकीर्तिविवर्धनम् ।
आपदुद्धरण वन्दे स्मर्तृगामी स माऽवतु ॥ ७ ॥

जन्मसंसारबन्धघ्नं स्वरुमानन्ददायकम् ।
निःश्रेयसप्रदं वन्दे स्मर्तृगामी स मा ऽ वतु ॥ ८ ॥

जयलाभयशः कामदातुर्दत्तस्य यः स्तवम् ।
भोगमोक्षप्रस्यदेमं प्रपठेत्स कृती भवेत् ॥ ९ ॥

## श्रीमद्भगवतद्गीता द्वादशोध्यायः ।

### अर्जुन उवाच ।

एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।
ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥ १ ॥

### श्रीभगवानुवाच ।

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ २ ॥

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।
सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥ ३ ॥

संनियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ ४ ॥

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ॥ ६ ॥

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ ७ ॥

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ ८ ॥

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥ ९ ॥

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन् सिद्धिमवाप्स्यसि ॥ १० ॥

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११ ॥

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद् ध्यानं विशिष्यते ।
ध्यानात्कर्मफल त्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥ १२ ॥

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहङ्कारः समदुःखसुखः क्षमी ॥ १३ ॥

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मे भक्तः स मे प्रियः ॥ १४ ॥

यस्मान्नोद्विजयतें लोको लोकान्नोद्विजते च यः ।
हर्षामर्षभयोद्वैगेर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥ १५ ॥

अनपेक्ष शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।
सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १६ ॥

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति ।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान् यः स मे प्रियः ॥ १७ ॥
समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।
शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः ॥ १८ ॥

तुल्यनिंदास्तुतिमौनी संतुष्टो येन केनचित् ।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥ १९ ॥

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।
श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियः ॥ २० ॥

इति श्रीमद्भगवतद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगोनाम द्वादशोऽध्यायः ॥

# निर्वाणाष्टक

मनोबुद्धयहंकार चित्तानि नाहं ।
नच श्रोत्र जिव्हे न च घ्राण नेंत्रे ॥
नच व्योम भुमिर्न तेजो न वायु ।
चिदानन्द रुपम् शिवों हं शिवोऽहं ॥ १ ॥

नच प्राण संज्ञो न वैं पन्चवायु: ।
न वा सप्तधातु न वा पचकोंष: ॥
न वाक्पाणि पादौ न चोपस्यपाय् ।
चिदानन्द रुपम् शिवों ऽहं शिवो ऽहं ॥ २ ॥

न मे द्वेषरागौं न मे लोभ मोहौ ।
मदो नैव मे नैव मात्सर्य भाव: ॥
न धर्मों न चार्थों न कामो न मोक्ष ।
चिदानन्द रुपम् शिवो ऽहं शिवो ऽहं ॥ ३ ॥

न पुण्यं न पापं न सौख्यं न दु:ख ।
न मन्त्रो न तीर्थं न वेदो न यज्ञ: ॥
अहं भोजनं नैव भोज्यं न भोक्ता ।
चिदानन्द रुपम् शिवो ऽहं शिवो ऽहं ॥ ४ ॥

न मृत्युर्न शंका न मे जाति भेद: ।
पिता नैव मे नैव माता न जन्म ॥

न बन्धुर्न मित्रं गुरुर्नैव शिष्यं ।
चिदानन्द रुपम् शिवोऽहं शिवोऽहं ॥ ५ ॥

अहं निर्विकल्पी निराकार रुपी ।
बिभूव्यर्प्यि सर्वत्र सर्वेन्द्रियाणि ॥
सदा मे समत्वं न मुक्तीर्न बन्धः ।
चिदानन्द रुपम शिवोऽहं शिवोऽहं ॥ ६ ॥

**—: भजन :—**

दिगम्बरा दिगम्बरा श्रीपादवल्लभ दिगम्बरा ॥
हरी ओऽऽऽऽऽऽम

:: श्री सिद्धयोग साधनाश्रम ::

-( रजि. क्र. ई ६७९७ मुंबई )-

: प्रकाशक :

श्री सिद्धमहायोग साधनाश्रम

११ / डी शं. वि. सोवनीपथ, गिरगांव

ज. शं. मार्ग मुंबई ४००००४

: मुद्रक :

श्री. कि. पां. उत्पात

इंदिरा प्रिं. प्रेस, पंढरपूर.

म. गांधी पथ - पंढरपूर, फोन २७८ पिन : ४१३३०४

-( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )-